# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577
**Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

**Website**: www.jdroamt.org
**Fax No**: (0721) 2577913


क्रमांक :- विकाअ/शिक्षण /प्रवेश/२०२१/ 971
दिनांक :- 22/7/2021

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय विनाअनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र,
पदवीका संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी तांत्रिकी व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशसाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ** :- १.मा.संचालक, तंशिस., म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२१/४५२ दिनांक १७ जुन २०२१.
२..या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/८८० दिनांक १२/७/२०२१.
३.विकाअ/शिक्षण/प्रवेश/२०२१/८९१ दिनांक १४/७/२०२१.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया लवकर सुरु होत असल्याने अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थानी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्राप्त झालेले संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून संलग्निकरण/समकक्षता प्रदान केल्याची माहिती, फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडून सबंधित वर्षाकरीता मान्यता मिळाल्याचे पत्र ऑनलाईन पध्दतीने सादर करुन सादर केलेली माहिती वरील नमूद कागदपत्रांसह दिनांक १४/७/२०२१ ते १६/७/२०२१ पर्यंत पदवीका संस्थांना या कार्यालयास प्रत्यक्ष उपस्थित राहण्याबाबत संदर्भ २ अन्वये कळविलेले आहे. तथापी संस्थाना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून अजुनपर्यंत संस्थांना समकक्षता/सलग्नीकरण प्राप्त न झाल्यामुळे सदरचा कार्यक्रम पुढे ढकलण्यात येत असल्याबाबतचे संदर्भ ३ अन्वये कळविण्यात आलेले आहेत.

तथापी आता महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून आपणास सलग्नता प्राप्त झालेली असल्यास अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रम चालविणा-या संस्थाना कळविण्यात येते की, सदर अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याकरीता आपणाकडे

आवश्यक संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध असल्यास **दिनांक २३/७/२०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहील्यास व भविष्यात तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचेकडून उपलब्ध झालेली लिंक बंद झाल्यास भविष्यात होणा-या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(डॉ. आर.पी. मोगरे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना माहीतीकरीता सविनय सादर.
२.प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.